महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ

(दादासाहेब फाळके चित्रनगरी)

अहवाल - ऑक्टोबर 2022 ते डिसेंबर 2022



ऑक्टोबर 2022 ते डिसेंबर 2022

व्यवस्थापकीय संचालक पदी डॉ.अविनाश ढाकणे यांची नियुक्ती



डॉ.अविनाश ढाकणे

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा डॉ.अविनाश ढाकणे दिनांक ३ ऑक्टोबर २०२२ रोजी पदभार स्वीकारला. दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या अधिकारी – कर्मचारी वर्गाने त्यांचे स्वागत केले.

प्रशासनाचा गाढा अभ्यास असणारे डॉ. ढाकणे हे यापूर्वी राज्याचे परिवहन आयुक्त म्हणून कार्यरत होते. मुळचे अहमदनगर जिल्हातील पाथर्डीचे ते रहिवासी आहेत. १९९४ साली पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून उप जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी प्रशासनात प्रवेश केला. पर्यवेक्षाधिन कालावधीत मालेगाव आणि नगर येथे उप विभागीय अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे. त्याचबरोबर तत्कालीन केंद्रीय वित्त राज्य मंत्री बाळासाहेब विखे पाटील यांचे विशेष कार्य अधिकारी, तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचे उप सचिव, तत्कालीन शिक्षण आणि ऊर्जा मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे खाजगी सचिव म्हणूनही त्यांनी काम केले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक, एम.आय.डी.सीच्या कोकण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर महानगर पालिकेचे आयुक्त, जळगाव जिल्हाचे जिल्हाधिकारी आदि महत्वाच्या पदांवर त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. राज्याचे परिवहन आयुक्त असताना परिवहन विभागातील अनेक धोरणात्मक निर्णय त्यांनी घेतले.

दादासाहेब फाळके चित्रनगरीचा परिपूर्ण विकास करण्यासाठी आणि जास्तीत जास्त चित्रपट, मालिका, जाहिराती यांचे चित्रीकरण इथे होण्यासाठी प्रयत्नशील राहील. तसेच चित्रीकरण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा निर्मिती संस्थांना उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे डॉ. ढाकणे यांनी सांगितले.

व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी घेतला चित्रनगरीच्या सुरक्षेचा आढावा



महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी सोमवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी गोरेगाव स्थित वसलेल्या दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसराची प्रत्येक्ष पाहणी करून सुरक्षेचा सखोल आढावा घेतला.

यावेळी व्यवस्थापक (कलागरे) विजय भालेराव, मुख्य सुरक्षा अधिकारी सुनील घोसाळकर, सुरक्षा अधिकारी सुनील पोखरकर उपस्थित होते.

दादासाहेब फाळके चित्रनगरी मनोरंजन क्षेत्राचा महत्वपूर्ण भाग आहे. ५२१ एकर जागेवर वसलेली चित्रनगरी विविध निर्मितीसंस्था आणि देश - विदेशातील पर्यटकांसाठीही आकर्षणाचा केंद्रबिन्दु आहे. त्यामुळे दादासाहेब फाळके चित्रनगरीतील रस्ते, कलागरे आदी पायाभूत बाबींचा विकास करतानाच येथील सुरक्षिततेवरही अधिक भर देण्यात येणार असल्याचे डॉ. ढाकणे यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी पहिला गेट, संतोष नगर, गणेश मंदिर, माळी नगर, सात नंबर देवीचा पाडा, वन विभाग गेट, हबाळे पाडा, एन.एफ गेट, आठ ते सोळा कलागरे, बॉलीवूड पार्क आदि ठिकाणी भेटी देऊन याठिकाणच्या सुरक्षेचा सखोल आढावा आणि परिसराची पाहणी केली. आगामी काळात चित्रनगरी परिसराचा कायापालट करून सुरक्षिततेसह निर्मितीसंस्थांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे डॉ.ढाकणे म्हणाले.

53 वा गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव
- फिल्म बाजार

गोवा सिनेमांची घोषणा



गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील *फिल्म मार्केट २०२२* मध्ये महाराष्ट्र शासनाकडून पाठवायच्या ५ मराठी चित्रपटांची निवड प्रक्रिया पूर्ण होऊन पोटरा , तिचं शहर होणं , पॉडीचेरी , राख आणि पल्याड या चित्रपटांची निवड झाल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी जाहीर केले.
सदर ५ मराठी चित्रपटांच्या निवडीसाठी ५ तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली होती. या समितीत निर्माती अभिनेत्री किशोरी शहाणे, एफटीआयआय चे धीरज मेश्राम , दिग्दर्शक मनोज कदम , चित्रपट समीक्षक दिलीप ठाकूर , चित्रपट लेखक व दिग्दर्शक महेंद्र तेरेदेसाई यांचा समावेश होता. या समितीने दादासाहेब फाळके चित्रनगरी येथे २५ चित्रपटांचे परीक्षण करत ५ चित्रपटांची निवड केली. या महोत्सवासाठी प्रत्येक चित्रपटाचे दोन प्रतिनिधी या प्रमाणे ५ चित्रपटाचे १० प्रतिनिधी पाठविण्यात आले होते.

या चित्रपटांच्या निर्मात्यांचे व संपूर्ण चमुचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले आहे व शुभेच्छा दिल्या.

'आय लव बॉलीवूड' सेल्फी







५३ व्या गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या फिल्म मार्केटमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ सहभागी झाली होते. येथे घेतलेल्या फिल्म ऑफिसला केंद्रीय माहिती-प्रसारण, क्रीडा-युवक कल्याण मंत्री अनुराग ठाकूर यांनी भेट दिली. त्यांनी फिल्म ऑफिसच्या अंतर्गत सजावटीची पाहणी करत कौतुक केलेच, शिवाय आवर्जून 'आय लव बॉलीवूड' सेल्फीही घेतला. यावेळी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे उपस्थित होते.

२१ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या कालावधीत फिल्म बाजारकरीता महामंडळाच्या वतीने पोटरा, तिच शहर होणं, पल्याड आणि राख या चार सिनेमांची निवड झाली होती. याचारही सिनेमांची इंडस्ट्री स्क्रीनिग येथे झाले. सिनेमांच्या मार्केटीच्या दृष्टीने महामंडळाने येथे फिल्म ऑफीस घेऊन महाराष्ट्र आणि बॉलीवूड या थीमवर आधारीत या फिल्म ऑफिसची रचना केली होती. अतिशय आकर्षक केलेल्या सजावटीमुळे महाराष्ट्र फिल्म ऑफिस सगळ्याचे लक्ष वेधून घेतले. देशी-परदेशी फिल्ममेकर, चित्रपट रसिक, जाणकार या फिल्म ऑफीसला आवर्जून भेट देत होते.

परिसंवाद



गोवा फिल्म बजार 2022 मध्ये 'नॉलेज सिरिज' उपक्रमातर्गत Maharashtra - the ultimate Filming Destination या विषयावरील परिसंवादात महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे आश्वासक विचार व्यक्त केले.

या परिसंवादात सांस्कृतिक आणि पर्यटन विभागाचे सचिव डॉ. सौरभ विजय, अभिनेता-निर्माता आदिनाथ कोठारे, अभिनेत्री अमृता सुभाष, आणि इतर मान्यवर सहभागी झाले होते.

व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांचा पत्रकारांशी दिलखुलास संवाद




गोवा आंतरराष्ट्रीय फिल्ममार्केटच्या महाराष्ट्र फिल्म ऑफिसमध्ये दादासाहेब फाळके चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी पत्रकारांशी दिलखुलास संवाद साधला.

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने पोटरा, राख, पल्ल्याड, तिचं शहर होणं हे चार चित्रपट या महोत्सवसाठी निवडण्यात आले आहेत. पत्रकार परिषदेवेळी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक उपस्थित होते.

मान्यवर भेटी




प्रसिद्ध निर्माता,अभिनेता संजय सुरी यांनी गोवा आंतरराष्ट्रीय फिल्ममार्केटच्या महाराष्ट्र फिल्म ऑफिसला (दादासाहेब फाळके चित्रनगरी) भेट दिली.



Director, producer Devyani Anant यांनी महाराष्ट्र फिल्म ऑफिसला भेट दिली.

मान्यवर भेटी



Bollywood actress Hrishitaa Bhatt visit



जेष्ठ अभिनेते, निर्माते मुकेश ऋषी यांनी भेट दिली.



अभिनेता आदित्य कोठारे यांनी भेट दिली



गोवा आंतरराष्ट्रीय फिल्ममार्केटच्या महाराष्ट्र फिल्म ऑफिसला (दादासाहेब फाळके चित्रनगरी) सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव श्री. सौरव विजय यांनी भेट दिली

महाराष्ट्र फिल्म ऑफिसच्या सजावटीचे सर्वत्र कौतुक



आंतरराष्ट्रीय फिल्म बाजाराची सांगता झाली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र, चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत यंदा राख, पोटरा, तिचं शहर होणं, पल्याड या चार सिनेमांची निवड करण्यात आली होती. या सिनेमांची इंडस्ट्री स्क्रिनींग येथे झाली. त्याला चित्रपट जाणकारांनी चांगला प्रतिसाद दिला. चित्रपटाच्या जागतिक व्यासपीठावर उपलब्ध करून दिलेल्या संधीबद्दल चित्रपटांच्या निर्माता, दिग्दर्शकांनी राज्य शासन आणि महामंडळाचे आभार व्यक्त केले.

महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्मात्यांना फिल्म बाजारात महामंडळामार्फत सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यामुळे चारही चित्रपटाच्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी फिल्म बाजारात मार्केटिंगसाठी प्रयत्न केला. या कालावधीसाठी महामंडळाने येथे फिल्म ऑफिस देखील घेतले होते. त्यामुळे दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी देशी- परदेशी चित्रपट निर्माते, जाणकारांसोबत दीर्घ चर्चा करणे, बैठका करणे सोईचे झाले. मुख्य म्हणजे फिल्म ऑफिसची करण्यात आलेली देखणी-आकर्षक सजावट फिल्म बाजारात चर्चेचा विषय ठरली. अशाप्रकारे मराठी या प्रादेशिक भाषेतील चित्रपटाना जागतिक स्तरावर व्यासपीठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी, आणि सांस्कृतिक विकास महामंडळ करत असलेल्या प्रयत्नांचे जाणकारांनी भरभरून कौतुक केले.



Former president Mrs.Tarja Halonen, visit Chitranagari



Finland देशाच्या माजी राष्ट्राध्यक्ष Mrs.Tarja Halonen, यांनी visited Dadasaheb Phalke Chitranagari ला भेट दिली. यावेळी व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी त्यांचे स्वागत केले.

